तरूण भारत

# विद्यापीठाचे 'नॅक' मूल्यांकन आजपासून



- मूल्यांकनासाठी विद्यापीठ सज्ज
- सात मुद्यांवर होणार मूल्यांकन
- सहा सदस्यीय कमिटीचा समावेश

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या नॅक मूल्यांकनास आज ( दि. १५ ) पासून सुरुवात होणार आहे. बुधवार १७ मार्चपर्यंत नॅक पिअर कमिटी मूल्यांकनाचे काम करणार आहे. रविवारी ही कमिटी कोल्हापुरात दाखल झाली आहे. नॅक कमिटीसमोर टक्के गुणांसाठी कुलगुरू, अधिविभागप्रमुख, प्राध्यापक सादरीकरण करणार आहेत. आजी-माजी विद्यार्थी, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांच्याशी संवाद साधला जाणार आहे. तसेच अभ्यासक्रम, अध्यापन, अध्ययन, संशोधन आदी सात मुद्द्यांवर नॅकचे मूल्यांकन होईल. मूलभूत सुविधा, शिक्षणासाठीची उपकरणे, प्रयोग शाळा, ग्रंथालय, विद्यार्थ्यांसाठीच्या विविध सुविधा, प्रशासन कसे चालते, कमवा व शिका योजना, पर्यावरणपूरक विद्यापीठ, परिसरातील जैवविविधता, पाणी व्यवस्थापन आदींची पाहणी करणार आहेत. या कमिटीमध्ये उदयपूर येथील मोहनलाल सुखाडिया विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. जे. पी. शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली ६ सदस्यीय कमिटी पाहणी करणार आहे. सचिव बेंगलोर डॉ. बी. आर. कौशल, पश्चिम बंगाल येथील एस. ए. एच. मोनुद्दिन, पंजाब, भटिंडा येथील डॉ. तरूण अरोरा, दिल्ली येथील डॉ. सुनिल कुमार, मेघालय शिलाँग येथील डॉ. हरिश्चंद्र दास या सदस्यांचा कमिटीमध्ये समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

15 MAR 2021

तरूण भारत

# 'अर्जुनाचा एकलव्य' तरुणांसाठी प्रेरणादायी

## कुलगुरू डॉ. शिर्के यांचे गौरवोद्गार : डॉ. कुंभार यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर

अतिशय प्रतिकुल परिस्थितीमध्ये ग्रामीण भागातून येऊन जिद्दीने, स्वयंस्फुर्तीने इंग्रजी सारख्या विषयामध्ये प्राविण्य मिळवले. 'अर्जुनाचा एकलव्य' पुस्तक तरुणाईला प्रेरणादायी ठरणार आहे, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले.

विद्यापीठातील मिटींग हॉलमध्ये मुरगुड येथील सदाशिवराव मंडलिक कॉलेजचे प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार लिखित 'अर्जुनाचे एकलव्यायन' या आत्मकथनपर पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के अध्यक्षस्थानावरून बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. माया पंडीत यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. भालबा विभूते, डॉ. राजेंद्र कुंभार, डॉ. अच्युत माने यांनी मनोगत व्यक्त केले. विठ्ठल कोतेकर यांनी सूत्रसंचालन केले.



**कोल्हापूर : डॉ. अर्जुन कुंभार लिखित 'अर्जुनाचा एकलव्य' पुस्तकाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. माया पंडीत, डॉ. बी. एम. हिर्डेकर आदी.**

सकाळ

# विद्यार्थ्यांना महाविद्यालयांनी व्यासपीठ द्यावे : कुलगुरू शिर्के

कोल्हापूर, ता. १४ : "विद्यार्थी आणि विद्यार्थिनींच्या कलागुणांना वाव देण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ही प्रत्येक महाविद्यालयांची असते," असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद हॉलमध्ये ऑनलाईन आयोजित कराड येथील यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स आणि वेणूताई चव्हाण कॉलेज यांच्या अनुक्रमे 'यशवंत' आणि 'संगम' नियतकालिकांचे प्रकाशन झाले. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "महाविद्यालयीन नियतकालिक म्हणजे विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना विचार व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देत असते. विद्यापीठ क्षेत्रात २७६ महाविद्यालये आहेत. सर्वच महाविद्यालये याकडे गंभीरतेने पाहतात," असे नाही. महाविद्यालयांनी नियतकालीकांचे प्रकाशन न करणे म्हणजे त्यांच्या विद्यार्थ्यांना व्यक्त होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध न करून देण्यासारखे आहे. 'संगम' नियतकालीकेच्या मुखपृष्ठावर भारत देश जगाला कोरोना प्रतिबंधक लस व्हॅक्सीन देण्यासाठी आत्मनिर्भर झाला आहे, हे दाखविले आहे. 'यशवंत'च्या मुखपृष्ठावर जगाला कोविडने बांधून टाकलेले आहे. हे जोखड काढून टाकण्याची चावी भारत देशाकडे आहे, हे गौरवास्पद आहे, असे त्यांनी सांगितले. 'यशवंत' नियतकालिकेचे संपादन डॉ.. ए. व्ही. माळी, तर 'संगम' नियतकालिकेचे संपादन डॉ. महेंद्र कदम-पाटील यांनी केले. प्राचार्य डॉ. एल. जी. जाधव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एस. बी. केंगार यांनी आभार मानले. प्रकाश पाटील, डॉ. बी. एन. गोफणे आदी उपस्थित होते.

पुढारी

# सामाजिक चिकित्सालयाची नितांत गरज : कुलगुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

समाजशास्त्र विभागाने सामाजिक चिकित्सालयाची एक आगळी-वेगळी संकल्पना समाजासमोर आणली आहे, ज्याची समाजाला नितांत गरज आहे, असे प्रतिपादन कुलगुरु प्रा. डॉ. डी.टी. शिर्के यांनी केले.

समाजशास्त्र अधिविभागाच्या सामाजिक चिकित्सालयाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, समाजशास्त्र विभागातर्फे समाज विकासात भर घालण्यासाठी विशेषतः वैद्यकीय क्षेत्रात ॲलोपॅथिक, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक आणि योग या चार स्तरांवर समाजातील व्यक्तीच्या शारीरिक व्याधी कमी करण्यासाठी कार्यरत आहेत. असे असले तरी विविध व्यक्तिगत आणि कौटुंबिक प्रश्नांमुळे अनेक मानवनिर्मित व्याधी निर्माण होतात. सामाजिक नाते संबंध अतिशय संवेदनशील असतात. त्यातील गुंता हळुवारपणे सोडवण्यासाठी हे चिकित्सालय उपयुक्त ठरेल. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, व्याधीग्रस्त व्यक्तींची वर्गवारी करून त्यानुसार ते प्रश्न सोडविण्यासाठी समुपदेशनाची आवश्यकता आहे. अशा प्रकारच्या सामाजिक चिकित्सालयाची संकल्पना केवळ विद्यापीठातच नव्हे तर देशातील कदाचित अशा स्वरूपाचा हा पहिला अभिनव उपक्रम असावा.

समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे यांनी सामाजिक चिकित्सालयाची संकल्पना, त्याची आवश्यकता व व्याप्ती विशद केली. डॉ. पी. एम. माने यांनी आभार मानले. यावेळी वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, डॉ. व्ही. एस. मारूलकर, डॉ. प्रतिमा पवार, डॉ पी.बी. देसाई, डॉ. संजय कांबळे, कोमल ओसवाल, अभिजित पाटील उपस्थित होते.

लोकसत्ता

# शिवाजी विद्यापीठात सामाजिक चिकित्सालयाचे उद्घाटन

कोल्हापूर : समाजाला नितांत आवश्यकता असणाऱ्या सामाजिक चिकित्सालयाची एक आगळी वेगळी संकल्पना समाजशास्त्र विभागाने समाजासमोर आणली आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी.टी. शिर्के यांनी व्यक्त केले. समाजशास्त्र अधिविभागाच्या सामाजिक चिकित्सालयाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के व प्र–कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या हस्ते सामाजिक चिकित्सालयाचे उद्घाटन करण्यात आले. समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे यांनी सामाजिक चिकित्सालयाची संकल्पना विशद केली. डॉ. शिर्के म्हणाले, की सामाजिक नाते संबंध अतिशय संवेदनशील असतात. त्यातील गुंता हळुवारपणे सोडवण्यासाठी हे चिकित्सालय उपयुक्त ठरेल. डॉ. पी.एस. पाटील म्हणाले, की व्याधिग्रस्त व्यक्तींची वर्गवारी करून त्यानुसार ते प्रश्न सोडविण्यासाठी समुपदेशनाची आवश्यकता आहे. डॉ. पी. एम. माने यांनी आभार मानले. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, डॉ. व्ही. एस. मारुलकर, डॉ. प्रतिमा पवार, डॉ पी.बी. देसाई, डॉ. संजय कांबळे, कोमल ओसवाल, अभिजित पाटील, विभागातील संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी

संक्षिप्त

# विद्यापीठ 'नॅक' मूल्यांकन आजपासून

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठ चौथ्या टप्प्यातील नॅक मूल्यांकनास सोमवार (दि. १५) पासून प्रारंभ होणार आहे. १७ मार्चपर्यंत नॅक बेंगलोरची पिअर टीम पाहणी करणार आहे. विद्यापीठाची नॅक मूल्यांकनाची तयारी झाली आहे. सोमवारी सकाळपासून माजी कुलगुरू डॉ. जे. पी. शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यीय टीम पाहणी करणार आहे. सात विविध घटकांमधील ३८ मुद्द्यांच्या आधारे वैज्ञानिक पद्धतीने तपासणी केली जाणार आहे. प्रारंभी कुलगुरू विद्यापीठाच्या कामगिरीचा आढावा सादरीकरणाद्वारे मांडणार आहेत. त्यानंतर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, परीक्षा विभाग सादरीकरण होणार आहे. मूलभूत सुविधा, शैक्षणिक उपकरणे, प्रयोग शाळा, ग्रंथालय, विद्यार्थ्यांसाठीच्या सोयी-सुविधा, प्रशासन, कमवा व शिका योजना आदींची पाहणी टीम करणार आहे.

सकाळ

# 'डी. आर. भोसले' पुस्तकाचे गुरुवारी प्रकाशन

**कोल्हापूर :** येथील प्राचार्य डॉ. विलास पोवार लिखित 'कर्मवीर रावसाहेब डी. आर. भोसले चरित्र आणि कार्य' पुस्तकाचे गुरुवारी (ता. १८) प्रकाशन होणार आहे. राजर्षी शाहू स्मारक भवनात सायंकाळी साडेपाचला हा कार्यक्रम होईल. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, इतिहास संकलन समितीचे अध्यक्ष डॉ. बी. डी. खणे, शिवाजी विद्यापीठाचे माजी इतिहास विभागप्रमुख डॉ. अरुण भोसले यांची उपस्थिती असेल. रावसाहेब डी. आर. भोसले सलग दहा वर्षे सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष होते. येथे शिक्षणाधिकारी पदावर काम करताना त्यांनी गव्हर्न्मेंट सर्व्हंट को-ऑपरेटिव्ह बँक, प्राथमिक शिक्षक बँक, मराठी बँक, न्यूजपेपर असोसिएशन, मराठा महिला वसतिगृह, शेतकरी संघ आदी संस्थांच्या उभारणीत त्यांचा पुढाकार होता.

पुढारी

# परीक्षा पर्याय निवडीची आजपासून कार्यवाही

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या परीक्षासंदर्भात सोमवारपासून (दि. १५) ऑनलाईन, ऑफलाईन पर्याय निवडीच्या अनुषंगाने परीक्षा विभागाकडून कार्यवाही सुरू होणार आहे.

ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२१ मधील हिवाळी सत्राच्या परीक्षेसाठी अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन, ऑफलाईन पर्याय निवडीची १२ मार्च रोजीपर्यंतची मुदत संपली आहे. विद्यार्थ्यांनी निवडलेल्या पर्यायानुसार ऑफलाईन परीक्षेसाठी 'ओएमआर' शीटची छपाई करून ती महाविद्यालयांना पुरविण्यात येईल. ऑनलाईन परीक्षेच्या अनुषंगाने पेपर सेटर्सना प्रशिक्षण देणे, पेपर सॉफ्टेवअरमध्ये अपलोड केले जाणार आहेत.